**<u>पदोन्नतीचा मानीव दिनांक देणे.</u>**
**संबंधीत प्रशासकीय विभागाच्या सचिवांना अधिकार प्रत्यावर्तीत करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## सामान्य प्रशासन विभाग
## शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही - २०१५/व्हीआयपी २१०/प्र.क्र.४१२/का.-१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २१.०८.२०१५

<u>वाचा -</u>

1) **शासन परिपत्रक क्रमांकः एसआरव्ही-२००२/प्र.क्र.२/२००२/१२, दि.०६.०६.२००२**
2) **शासन पत्र क्रमांकः एसआरव्ही-२००९/प्र.क्र.१६५/१२, दि.१४.०९.२००९**

<u>प्रस्तावना -</u>

या विभागाच्या संदर्भ १ वरील दि.०६.०६.२००२ च्या शासन परिपत्रकान्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसंदर्भातील मानीव दिनांक देण्याबाबतच्या प्रकरणांना मान्यता देण्याबाबतचे प्राधिकार स्पष्ट केलेले असून त्यानुसार गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड संवर्गातील पदांवर पदोन्नतीचे मानीव दिनांक देण्याचे प्राधिकार विभाग प्रमुखांना असल्याचे तसेच गट-अ व गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील अधिकाऱ्यांना मानीव दिनांक प्रदान करताना सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभाग यांची मान्यता घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केलेले आहे.

याखेरीज संदर्भ २ वरील दि.१४.०९.२००९ च्या पत्रासोबतच्या इतिवृत्तामध्ये मानीव दिनांकाची प्रकरणे मान्य करताना शासनाची मान्यता घेतल्यानंतरच मानीव दिनांकाचे आदेश निर्गमित करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. मात्र प्रशासनात गतीमानता येण्यासाठी मानीव दिनांकाचे आदेश निर्गमित करण्याची प्रकरणे शासनास सादर न करता प्रशासकीय विभागाच्या सचिव स्तरावर निर्णय घेऊन निकाली काढण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

वरील बाब लक्षात घेऊन मानीव दिनांकाच्या प्राधिकारासंदर्भात या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

१. पदोन्नतीच्या कोट्यातील पदावर नियमित पदोन्नती दिलेल्या कनिष्ठाच्या नियमित पदोन्नतीचा दिनांक हा ज्येष्ठ अधिकारी/कर्मचाऱ्यास मानीव दिनांक देण्याच्या अनुषंगाने गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड संवर्गातील पदांवर पदोन्नतीचे मानीव दिनांक देण्याचे

प्राधिकार विभाग प्रमुखांना राहतील. मात्र सदर विभाग प्रमुख मंत्रालयाच्या सचिव दर्जाचे अधिकारी असणे बंधनकारक राहील. परंतु जे विभाग प्रमुख सचिव दर्जाचे नसतील त्यांच्या नियंत्रणाखालील वरील संवर्गातील कर्मचाऱ्यांना मानीव दिनांक प्रदान करण्याचे प्राधिकार संबंधित मंत्रालयीन विभागाच्या सचिवांना राहतील.

२. गट-अ व गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील अधिकाऱ्यांना मानीव दिनांक प्रदान करताना पूर्वीप्रमाणेच सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभाग यांची मान्यता घेणे आवश्यक राहील. तथापि मानीव दिनांकास सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर **मानीव दिनांकाचे आदेश निर्गमित करण्याचे अधिकार याव्दारे संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांना प्रदान करण्यात येत आहेत. परिणामी अशा प्रकरणी यापुढे शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.**

३. प्रशासकीय विभागाने वा विभागप्रमुखाने सरळसेवेच्या कोट्यातील पदावर अथवा तदर्थ स्वरुपात दिलेल्या पदोन्नतीचा दिनांक हा मानीव दिनांक म्हणून देण्यास मान्यता देऊ नये वा असे प्रस्ताव सामान्य प्रशासन व वित्त विभागांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येऊ नयेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०८२४१२०२४८१८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Sahai

Digitally signed by Bhagwan Sahai
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhagwan Sahai
Date: 2015.08.24 12:06:04 +05'30'

**(डॉ. भगवान सहाय)**
**अपर मुख्य सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,

९. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर,
१०. *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर,
११. *प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१२.*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३.*प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
१४. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मंबई,
१५.*सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१६.*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१७.*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
१८. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
१९. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
२०. *सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
२१. *प्रबंधक, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई ४०० ००१,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (२ प्रती प्रसिध्दीकरिता),
२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२५. सर्व विभागीय आयुक्त,
२६. सर्व जिल्हाधिकारी,
२७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२९. सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख, (मंत्रालयीन विभागांनी संबंधितांना प्रत पाठवावी)
३०. सामान्य प्रशासन विभाग/का. ३९ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता),
३१.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
३२.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३३.निवड नस्ती.